पुढारी

# विद्यापीठात महात्मा फुले यांची जयंती

कोल्हापूर : महात्मा ज्योतीराव फुले यांची जयंती शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी इंग्रजी अधिविभागाच्या काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषा केल्या होत्या. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. दिनकर मोरे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. औदुंबर सरवदे उपस्थित होते.

लोकमत

## शिवाजी विद्यापीठ

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. इंग्रजी अधिविभागाच्या काही विद्यार्थ्यांनी राष्ट्रपुरुषांच्या वेशभूषा केल्या होत्या. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, उपस्थित होते.

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरण आज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरण १३ रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. या पुरस्काराने भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना गौरवण्यात येणार आहे. प्रमुख पाहुणे सिक्कीमचे माजी राज्यपाल, खासदार श्रीनिवास पाटील यांच्या पुरस्कार वितरण सोहळा हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के भूषवणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी जास्तीत जास्त प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार प्रदान समारंभ गुरुवारी (दि.१३) दुपारी ४ वाजता राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे होणार आहे. भारती अभिमत विद्यापीठ, पुणेचे कुलपती प्रा. डॉ. शिवाजीराव कदम यांना रा. कृ. कणबरकर पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून खा. श्रीनिवास पाटील उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

13 APR 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासन देशातील पत्रकारितेची सर्वोच्च संस्था व्हावी

## डॉ. प्रतापसिंह जाधव; नवीन इमारत बांधकाम आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन हे देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन आहे. अध्यासनांतर्गत राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील अद्ययावत कोर्स सुरू करून देशातील पत्रकारितेची सर्वोच्च संस्था बनविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी केली.

विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी डॉ. जाधव यांनी अध्यासन इमारत बांधकामाची पाहणी करून काही सूचना केल्या. याप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारत बांधकाम आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एस. आर. पाटील, डॉ. शिवाजी जाधव, विनायक पाचलग आदी.

डॉ. जाधव म्हणाले, अध्यासन इमारतीचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण केल्यास लँड स्केपिंगसह इतर गोष्टी करणे सोपे होईल. मास कम्युनिकेशनचे वर्ग अध्यासनाच्या इमारतीमध्ये सुरू केल्यास वर्दळ वाढून त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होईल, यादृष्टीने प्रयत्न करावेत. दोन महिन्यांत इमारतीचे सर्व बांधकाम पूर्ण करावे, अशी सूचना डॉ. जाधव यांनी केली.

सोशल मीडिया तज्ज्ञ विनायक पाचलग यांनी नवीन अभ्यासक्रमाबाबत काही सूचना केल्या. सध्या सोशल मीडिया व चॅट-जीटीपीचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू आहे. त्या अनुषंगाने इंडस्ट्रीची गरज ओळखून नवीन कोर्सेस ठरवावेत. अध्यासनातर्फे तीन कोर्सेस सुरू आहेत. भविष्य काळाचा विचार करून आणखी अद्ययावत नवीन कोर्सेसची निर्मिती करावी. हे कोर्सेस जूनपासून सुरू करण्याचे नियोजन करावे, असेही ते म्हणाले. विनायक पाचलग यांच्यासह तज्ज्ञ मंडळी घेऊन कमिटी करावी, अशी सूचना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केली. तसेच अध्यासनामध्ये अद्ययावत डिजिटल स्टुडिओ तयार करावा, असे कुलगुरू म्हणाले.

आर्किटेक्ट शीतल पाटील म्हणाल्या, अध्यासन इमारतचा स्लॅब १५ दिवसांत पूर्ण झाल्यावर लँड स्केपिंगच्या कामास सुरुवात करता येईल. यावेळी अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनिता पाटील, बांधकाम ठेकेदार सुनील नागराळे, अभियंता डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह विद्यापीठ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुढारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. १४ रोजी सकाळी साडेनऊ वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. रमेश कांबळे यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक चिकीत्सक अवकाश या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रारंभी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

13 APR 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-आंबेडकरांना अभिप्रेत भारताची संकल्पना साकारणे शक्य

■ शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात सूर

प्रतिनिधी
कोल्हापूर

संविधानिक मूल्ये, लोकशाही शिक्षण आणि ज्ञान या त्रिसूत्रीच्या आधारे माणसाचे जगणे सुंदर बनविण्याचे ध्येय बाळगणे म्हणजेच महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारताची संकल्पना साकारणे शक्य आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात उमटला.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ झाला. याप्रसंगी झालेल्या परिसंवादाचा 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांची भारतविषयक संकल्पना" हा विषय होता. मान्यव्यविद्या सभागृहात झालेल्या परिसंवादात शारदाबाई पवार अध्यासनाच्या संचालक डॉ. भारती पाटील, सत्यशोधक चळवळीचे गाढे अभ्यासक डॉ. अरुण शिंदे आणि पुण्याचे वरिष्ठ पत्रकार टेकचंद सोनावणे सहभागी झाले. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना डॉ. भारती पाटील, सोबत डॉ. अरुण शिंदे, टेकचंद सोनवणे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. दीपा श्रावस्ती.

डॉ. पाटील म्हणाल्या, भारताच्या संकल्पनेमध्ये राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचे समाजवादी, धर्मनिरपेक्ष मार्गाने प्रस्थापन अभिप्रेत होते. त्या दिशेने आपण ५० वर्षे प्रवास केलाय. नवभारताच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये भारतीयांचा सहभाग आणि उत्तरदायित्व बाळगणारे सरकार अभिप्रेत आहे. डॉ. अरुण शिंदे म्हणाले, राजकीय स्वातंत्र्य मिळून उपयोगाचे नसून सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त समाजरचना असणारा भारत फुले यांना अभिप्रेत होता. टेकचंद सोनावणे म्हणाले, ज्ञान, नैतिक आचरण आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन ही त्रिसूत्री म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांच्या भारताची संकल्पना आहे.

अध्यक्षस्थानावरून डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, प्रगल्भ नागरिक घडल्याखेरीज फुले-आंबेडकरांच्या भारताची संकल्पना प्रत्यक्षात येणार नाही. त्यासाठी शिक्षणाच्या अनुषंगाने गांभीर्यपूर्वक विचार हवा.

डॉ. दीपा श्रावस्ती यांनी स्वागत केले. डॉ. किशोर खिलारे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 APR 2023 लोकमत

# शाहू महाराज : माहितीपट निर्मिती कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर** : राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद अधिविभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सवा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक माहितीपट निर्मिती' या विषयावरील दोनदिवसीय विशेष कार्यशाळा विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात पार पडली. कोल्हापूर पुरालेखागाराचे अधिकारी गणेशकुमार खोडके यांनी याचे उद्घाटन केले. प्रथम सत्रात खोडके यांनी शाहू महाराजांचे आदर्श हे शिवाजी महाराज होते, याचे अनेक पुरावे आजही कोल्हापूर अभिलेखागारामध्ये उपलब्ध आहेत असे सांगून, शिवाजी महाराजांच्या सुमारे २३९ पत्रांपैकी ३९ पत्रे कोल्हापूर अभिलेखागारात उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या सत्रात निवेदक विक्रम रेपे यांनी 'माहितीपटाची निर्मितीप्रक्रिया व माहितीपटांचे विषय' यावर मार्गदर्शन केले.

पुढारी

# शाहू महाराजांनी शिवरायांच्या प्रेरणेतून समाजाचा सर्वांगीण विकास घडविला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

## • गणेशकुमार खोडके यांचे प्रतिपादन

राजर्षी शाहू महाराजांचे आदर्श हे छत्रपती शिवाजी महाराज होते. स्वतः ते शिवरायांच्या प्रेरणेतून समाजाच्या सर्वांगीण विकास घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले, असे प्रतिपादन कोल्हापूर पुरालेखागारचे अधिकारी गणेशकुमार खोडके यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता आणि जनसंवाद अधिविभागातर्फे 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : ऐतिहासिक माहितीपट निर्मिती' याविषयावर दोन दिवसीय विशेष कार्यशाळा झाली. प्रथम सत्रात खोडके म्हणाले, शिवाजी महाराजांची २३९ पत्रे उपलब्ध आहेत. त्यापैकी ३९ पत्रे कोल्हापूर अभिलेखागारात उपलब्ध आहेत. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांची अनेक प्रशासकीय कागदपत्रे, ठराव, पत्रे अभिलेखागारात उपलब्ध असून, अनेक ऐतिहासिक घटना आणि निर्णयांचा संदर्भ देत, विद्यार्थांनी माहितीपट निर्मितीसाठी संदर्भ म्हणून त्यांचा वापर करावा.

दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध निवेदक विक्रम रेपे यांनी 'माहितीपटाची निर्मिती प्रक्रिया व माहितीपटांचे विषय' यावर मार्गदर्शन केले. त्यांनी अनेक शाहूकालीन वास्तू उपलब्ध असल्याचे सांगत, आजही अस्तित्वात असणारे अनेक भौतिक पुरावे निदर्शनास आणून दिले. डॉ. निलांबरी जगताप, जिल्हा माहिती अधिकारी, वृषाली पाटील यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. व्याख्यात्यांची ओळख डॉ. सुमेधा साळुंखे यांनी करून दिली. अश्विता इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. परशराम पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ संगीत विभागात रंगला स्वररंग

## भरतनाट्यम् नृत्य, तबला वादनासह विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने स्वररंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी उपशास्त्रीय, सुगम गीतप्रकार, रामायणातील प्रसंगावर आधारित भरतनाट्यम् नृत्य, एकल, तबलावादन इत्यादींचे बहारदार सादरीकरण केले. त्यांना गौरी कुलकर्णी व विद्यार्थी रोहन लाखे यांनी हार्मोनियमवर, तबला संदेश गावंदे, विक्रम परीट , सौरभ सनदी यांनी साथ केली.

संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना व सादरीकरणास विभागप्रमुख अंजली निगवेकर, सहायक प्रा. डॉ. विनोद ठाकूरदेसाई, निखिल भगत तसेच पद्मश्री बागडेकर, शिवानी ढेरे, गौरी कुलकर्णी, अतुल परीट यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
13 APR 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : दिवसभर रणरणत्या उन्हाने कोल्हापूरकर हैराण झाले असले तरी, बुधवारी सायंकाळी मावळतीच्या सूर्याच्या साक्षीने छत्रपती शिवरायांची प्रतिमा पाहताना मन प्रसन्न करणारा अनुभव देऊन गेला. शिवाजी विद्यापीठ इमारतीसमोरून टिपलेले छायाचित्र. (छाया: पप्पू अत्तार)

सकाळ

# 'सायन्स'कडे कल कायम


डाटा रिसर्च
संतोष मिठारी

**कोल्हापूर, ता. १२** : रोजगार, संशोधन, उच्च शिक्षणाची अधिक संधी असल्याने सायन्समधील (विज्ञान) अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा अधिक कल आहे. कालानुरूप अभ्यासक्रमांमध्ये बदल झाला नसल्याने आणि रोजगारांची संधी मर्यादीत झाल्याने पारंपारिक अभ्यासक्रमांकडे मात्र, विद्यार्थी पाठ फिरवत आहेत. हे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या आकडेवारी स्पष्ट होत आहे. गेल्यावर्षी विद्यापीठाने पदव्युत्तर ६४ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली. या अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता एकूण २२७३ इतकी होती. त्यासाठी ११, ४०८ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यापैकी १८९८ जणांनी प्रवेश निश्चित केले. एकूण ३७५ जागा रिक्त राहिल्या.

## कालानुरूप बदल आवश्यक

पारंपारिक अभ्यासक्रम अद्ययावत होणे आवश्यक आहे. ही अभ्यासक्रम बदलाची प्रक्रिया अधिक गतीमान होणे गरजेचे असल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखेच्या माजी अधिष्ठाता डॉ. वासंती रासम यांनी सांगितले.

**दृष्टिक्षेपात दोन अभ्यासक्रम**




**अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांची**

| अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|---|
| रसायनशास्त्र | २११ | १९७ |
| कॉम्प्युटर सायन्स | ६० | ६४ |
| मॅथेमेटिक्स | ६० | ६५ |
| फिजिक्स | ७० | ६८ |
| झूलॉजी | ६० | ६६ |
| राज्यशास्त्र | ६० | ६८ |
| ॲग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट | ४० | ४५ |
| बी. लिब. | ४० | ४२ |
| बायोटेक्नॉलॉजी | ८३ | ६५ |
| बॉटनी | ५५ | ५० |
| अर्थशास्त्र | ९६ | ९८ |
| सामाजिकशास्त्र | ६० | ६० |
| इंग्रजी | ६० | ५७ |
| मराठी | ७० | ५५ |
| हिंदी | ६० | ४४ |
| एलएलएम | ६० | ४४ |
| बी. जे. सी. | ४० | ४ |
| म्युझिक | ६० | २४ |
| एम. ए. मासकॉम | ३० | २० |
| एम.जे.सी. | ३० | ८ |
| पर्यावरणशास्त्र | ५० | १९ |
| मास्टर ऑफ रुरल स्टडीज | ६० | २८ |

“ स्पर्धा परीक्षा अथवा शिक्षक म्हणून काम करण्याच्या पलीकडील संधीची माहिती नसल्याने पारंपरिक अभ्यासक्रमांची विद्यार्थी संख्या कमी दिसते. त्यावर कोरोना, निकालांच्या विलंबाचाही परिणाम झाला आहे. या अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरच्या संधींची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न विद्यापीठाचा राहणार आहे. रोजगाराभिमुख, कौशल्य विकासाचे काही नवे अभ्यासक्रम सुरू केले असून, त्यांची संख्या वाढविली जाईल.

**- डॉ. विलास शिंदे**, प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ